# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/ A71222

"उद्योग सारथी",
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : 6 MAR 2013

## परिपत्रक

**विषय : भूखंड विकसित करण्यासाठी मुदतवाढ देण्याचे सुधारित धोरण.**

महामंडळाने विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील वाटप केलेल्या भूखंडाचा विकास भूखंडधारकाने विहित मुदतीत करणे अत्यावश्यक आहे. **भूखंडाचा विकास म्हणजे विहित मुदतीत मंजूर नकाशाप्रमाणे नियोजित इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन इमारत पूर्णत्वाचा दाखला (BCC) प्राप्त करुन उत्पादनास सुरुवात करणे असा आहे.** मात्र, काही भूखंडधारक करारनाम्यातील नमूद विहित मुदतीत अथवा वाढवून दिलेल्या मुदतीतसुध्दा भूखंडाचा विकास करत नसल्याचे दिसून येते. तर काही भूखंडधारक मुदतवाढ न घेता अथवा मुदतवाढ मिळेलच असे गृहीत धरुन भूखंड वर्षानुवर्षे अविकसित ठेवत असल्याचे दिसून येते. तसेच, काही उद्योजक मंजूर नकाशाप्रमाणे थोडेफार बांधकाम करुन उत्पादन सुरु करतात. मात्र, इमारत पूर्णत्वाचे दाखले प्राप्त करत नाहीत अथवा इमारत पूर्णत्वाचे दाखले त्यांचेकडून घेण्याचे राहून गेलेले असते. काही उद्योजकांचा असा गैरसमज झालेला आहे की, ते केव्हाही मुदतवाढीची मागणी करु शकतात आणि ती त्यांना आपोआप मिळू शकते. महामंडळाकडूनसुध्दा भूखंड विकासासाठी सतत पाठपुरावा केला जात नाही. पर्यायाने उद्योग विकासाला खिळ बसत आहे. सद्य:स्थितीत मुदतवाढीच्या प्रचलित धोरणात भूखंड विकासासाठी किती मुदतवाढी द्याव्यात याबाबत सुस्पष्टता नाही. त्यामुळे, वेळप्रसंगी भूखंडधारकाने मागणी केलेली अमर्याद मुदतवाढ मंजूर करणे महामंडळास भाग पडते. भूखंडधारकाची भूखंड विकास करण्यासंदर्भातील मानसिकता व गैरसमज दूर करण्याच्या दृष्टीने तसेच ज्या उद्देशाने महामंडळाने भूखंडाचे वाटप केले आहे तो उद्देश सफल होण्याच्या दृष्टीने भूखंड विकासासाठी मुदतवाढीच्या प्रचलित धोरणात बदल करणे आवश्यक असल्याने आणि प्रचलित धोरणानुसार ज्या भूखंडधारकांनी भूखंड विकासासाठी ठोस प्रयत्न/परिणामकारक कार्यवाही केलेली आहे, मंजूर नकाशाप्रमाणे बांधकामास सुरुवात केलेली आहे. मात्र, ते पूर्ण करुन इमारत पूर्णत्वाचे दाखले प्राप्त केलेले नाहीत, अशा भूखंडधारकांना शेवटची संधी म्हणून विशेष मुदतवाढ योजने अंतर्गत मागील मुदतवाढी प्रचलित धोरणानुसार नियमानुकुल करुन घेण्यासाठी अंतीम संधी देण्यासाठी आणि नव्याने वाटप केलेल्या/करावयाच्या भूखंडाच्या विकासासाठी सुधारित धोरण ठरविणे आवश्यक असल्याने त्याबाबतचा विषय महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक १८.१२.२०१२ रोजी झालेल्या ३४८ व्या सभेत सादर करण्यात आला होता. सादर विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठराव क्र. ५१६७ पारीत करण्यात आला